

# मुखेड हद्दीतील दरोड्याचा गुन्हा उघड; एका आरोपीस अटक

**नांदेड**– मुखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका दुचाकीस्वारास चाकूचा धाक दाखवून सव्वा दोन लाख रुपये लुटणाऱ्या दरोडेखोराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून रोख ९ हजार रुपयांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुन्ह्यानंतर लगेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांनी पथके केली. दि. १ जून रोजी मुखेड हद्दीत चांडोळा येथून भगणूरकडे जात असताना पाच इसमांनी मोटारसायकल खाली पाडून चाकूचा धाक दाखवून नगदी दोन लाख २५ हजार रुपयाची बॅग व एक सॅमसंग कंपनीचा बायोमॅट्रीक टॅब असा एकूण दोन लाख ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता. आरोपी नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये पळून गेल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे स्थागुशाचे पोउपनि दत्तात्रय काळे व त्यांचे पथक सदर जिल्ह्यांमध्ये आरोपीतांचा शोध घेवून गुन्ह्यातील आरोपी सक्षम गौतम ताटे (वय २०) रा. संघसेननगर, नांदेड यास ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याने व त्याचे इतर चार मित्रांनी मिळून हा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदर आरोपीकडून नगदी ९ हजार रुपये व एक ४० हजार रुपये किंमतीचा मोबाईल असा ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे, पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रय काळे, हवालदार विलास कदम, गणेश धुमाळ, चापोहेकॉ अर्जुन शिंदे, राजेंद्र सिटीकर, दिपक ओढणे यांनी पार पाडली आहे. या गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक संदिप गुरमे व वेदांतनगरचे पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांनी सहकार्य केले आहे.